# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

(वर्ष ६५ वे अंक १४७) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) शनिवार, दि.०६ जून २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)


## मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार; सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या गोळीबारात ३ जणांचा मृत्यू

इम्फाळ दि.५ (प्रतिनिधी)- मणिपूरमधील हिंसाचार पुन्हा एकदा उफाळून आला असून कांगपोकपी जिल्ह्यातील एका गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी केलेल्या हल्ल्यात एका महिलेसह तिघांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी अनेक मिनिटे गोळीबार केल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले, तर किमान सात घरे आगीत जळून खाक झाली. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी पहाटे सुमारे चार वाजण्याच्या सुमारास सैतू-गामफाझोल उपविभागातील लोइबोल खुल्लेन या गावावर सशस्त्र हल्लेखोरांनी हल्ला चढवला. प्रतिस्पर्धी गटांमध्ये झालेल्या गोळीबारामुळे ग्रामस्थांनी जीव वाचवण्यासाठी जवळच्या जंगलांमध्ये आश्रय घेतला. या घटनेत लेटखोंगाम हाओकिप, टिनमेरी हाओकिप आणि जांगमिनलाल हाओकिप यांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये एका महिलेचाही समावेश आहे. मुख्यमंत्री वाय. खेमचंद सिंह आणि उपमुख्यमंत्री नेमचा किपगेन यांनी हल्ल्याचा निषेध केला आहे. निरपराध नागरिकांची हत्या आणि घरे जाळण्याचा प्रकार अत्यंत दुर्दैवी व अस्वीकार्य असल्याचे सांगत दोषींवर कायद्यानुसार कठोर कारवाई केली जाईल, असे त्यांनी नमूद केले.

# मराठा समाजाला ओबीसींप्रमाणे ८ योजनांमध्ये सवलती; राज्य सरकारचा निर्णय

## हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी होणार फायदा

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- मराठा समाजाच्या आर्थिक आणि शैक्षणिक प्रगतीसाठी फडणवीस सरकारनं एक अत्यंत महत्त्वपूर्ण आणि मोठा निर्णय घेतला आहे. आता इतर मागासवर्गीय समाजाप्रमाणेच मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही सर्व शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा लागू करण्याचा ऐतिहासिक निर्णय शासनानं घेतला आहे. शासनाने घेतलेल्या या निर्णयानुसार, ओबीसी प्रवर्गाच्या धर्तीवर मराठा समाजासाठी तब्बल ८ विशेष योजना सुरू करण्यात येणार आहेत. यामुळे मराठा समाजातील हजारो विद्यार्थ्यांना उच्च आणि व्यावसायिक शिक्षणासाठी मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहात सक्षम करण्यासाठी शासनाने लागू केलेल्या योजनांचा आज तपशील घोषित करण्यात आला. यामध्ये दहावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील उच्च शिक्षणासाठी ओबीसी विद्यार्थ्यांना मिळणारी शालांत परिक्षोत्तर शिष्यवृत्ती योजना आता मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांनाही लागू होईल. मराठा समाजातील तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोटार वाहन चालक व वाहक प्रशिक्षण योजना सुरू करण्यात येणार आहे. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गातील विद्यार्थ्यांना लागू असलेली विशेष शिष्यवृत्ती योजना मराठा प्रवर्गासाठी विस्तारित करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना लागू असलेल्या इतर १६ बाबींबाबतच्या शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती थेट शासनाकडून करण्याची योजना यात समाविष्ट आहे. महाराष्ट्र राज्यातील रहिवासी असणारे, परंतु परराज्यात अनुदानित व विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या मराठा उमेदवारांना या योजनेचा लाभ घेता येईल. इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती आणि सोयी-सुविधा मिळण्यासाठी पात्र असलेल्या सर्व घटकांचा अभ्यास आता मराठा समाजासाठी खुला करण्यात आला आहे. सर्व मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आता मराठा समाजातील विद्यार्थी पूर्णपणे पात्र धरले जातील. केंद्रीयभूत प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर महाविद्यालयांमध्ये रिक्त राहिलेल्या जागांवर, प्रवेश नियंत्रण समितीने मान्यता दिलेल्या संस्थास्तरावरील जागांवर प्रवेश घेतलेल्या मराठा विद्यार्थ्यांनाही इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणेच सर्व शैक्षणिक सवलती लागू करण्यात येणार आहेत. भविष्यात इतर मागास प्रवर्गास ज्या काही नवीन शैक्षणिक सवलती व सोयी-सुविधा लागू करण्यात येतील, त्या सर्व सवलती पुढील कोणत्याही नवीन आदेशाची वाट न पाहता मराठा समाजास आपोआप लागू होतील, अशी अत्यंत महत्त्वाची तरतूदही या निर्णयात करण्यात आली आहे.

## पती १३ दिवस न बोलणे म्हणजे 'क्रूरता' नाही-सुप्रीम कोर्ट

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- ''पत्नीशी काही दिवस न बोलल्याच्या कारणावरून पतीला क्रूरतेच्या गुन्ह्याखाली दोषी ठरवले जाऊ शकत नाही,'' असे महत्वपूर्ण निरीक्षण नोंदवत सर्वोच्च न्यायालयाने एकाची त्याच्या पत्नीच्या आत्महत्याप्रकरणी निर्दोष मुक्तता केली आहे. ''वैवाहिक जीवनात मतभेद आणि वाद होणे हा संसाराचाच एक भाग आहे, यामुळे दोघांमध्ये काही काळ संपर्क तुटू शकतो,'' असेही न्यायालयाने पुढे स्पष्ट केले. यापूर्वी जिल्हा न्यायालय आणि मद्रास उच्च न्यायालयाने संबंधित पतीला भारतीय दंड संहितेच्या कलम ४९८-अ अंतर्गत दोषी ठरवून तीन वर्षांच्या कारावासाची शिक्षा सुनावली होती. सर्वोच्च न्यायालयाने हा निकाल रद्द केला आहे. न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी आणि न्यायमूर्ती अतुल एस. चांदूरकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. पती सलग १३ दिवस आपल्या पत्नीशी बोलला नाही या कारणावरुन पत्नीने गळफास लावून आत्महत्या केली होती.

## स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका रद्द करा

### भाजप नेते मुनगंटीवार यांची मागणी, निवडणूक पद्धतीवरही टीका

चंद्रपूर दि.५ (प्रतिनिधी)- वारंवार लागू होणारी आचारसंहिता आणि त्यामुळे विकासकामांवर होणारा परिणाम यावर भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी शुक्रवारी तीव्र नाराजी व्यक्त केली. स्थानिक स्वराज्य संस्थांमधून होणाऱ्या विधान परिषद निवडणुका रद्द करण्याची मागणी करताना त्यांनी निवडणूक प्रक्रियेच्या सध्याच्या पद्धतीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

विशेष म्हणजे गुरुवारी विधान परिषद निवडणुकीत भाजपचे उद्योगपती उमेदवार अरुण लखनी बिनविरोध निवडून आले आहे. या निवडणुकीत काँग्रेस नगरसेवक मतदारांना प्रत्येकी पाच पाच लाख रुपये देऊन भाजपने विकत घेऊन गोवा येथे पर्यटनाला पाठविले होते याचीही चांगलीच चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

एका कार्यक्रमात मुनगंटीवार यांनी माध्यमांशी बोल ताना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रतिनिधींमार्फत होणाऱ्या विधान परिषद निवडणुकांवर टीका करताना, ''देशातील काहीच राज्यांत हा प्रकार सुरू आहे. या निवडणुकांमुळे नगरसेवक व स्थानिक लोकप्रतिनिधींवर अनावश्यक राजकीय दबाव निर्माण होतो. आमदार व्हायचे असेल तर थेट जनतेतून निवडून यायला हवे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झालेल्या नसताना अशा निवडणुका घेणे म्हणजे ग्रामीण जनतेवर अन्याय आहे.''निवडणूक आयोगाकडे यासंदर्भात पत्रव्यवहार केल्याचे सांगताना त्यांनी, ''दोन वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेता आल्या नाहीत, मग आता विधान परिषद निवडणुकीची एवढी घाई का करण्यात आली?'' असा सवाल उपस्थित केला.

आचारसंहितेच्या अंमलबजावणीवर भाष्य करताना मुनगंटीवार म्हणाले की, मागील पाच वर्षांत तब्बल ३१५ दिवस विविध निवडणुकांमुळे आचारसंहिता लागू होती. त्यात साप्ताहिक सुट्ट्या आणि सार्वजनिक सुट्ट्यांचा विचार केला तर प्रशासनाचा मोठा कालावधी प्रत्यक्ष कामकाजाशिवाय जातो. ''जर वर्षभर आचारसंहितेचेच निर्बंध असतील, तर विकासकामे करायची कशी?'' असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

चंद्रपूर जिल्ह्यातील विविध विकासकामांचा उल्लेख करताना त्यांनी पिण्याच्या पाण्याची समस्या, पांदण रस्ते, शेतकऱ्यांचा पतपुरवठा, खत वितरण तसेच वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांवरील उपाययोजना यांसाठी बैठका घेण्यासही आचारसंहितेचे कारण पुढे केले जात असल्याची खंत व्यक्त केली.

सिंदेवाही तालुक्यातील गुंजेवाही येथे वाघाच्या हल्ल्यात चार महिलांचा मृत्यू झाल्यानंतर उपाययोजनांसाठी बैठक घेण्याचाही प्रयत्न आचारसंहितेमुळे रखडल्याचा दावा त्यांनी केला. ''प्रत्येक प्रशासकीय निर्णयाला आचारसंहितेचा अडसर निर्माण होत असेल, तर त्याचा फेरविचार होण्याची गरज आहे,'' असे ते म्हणाले.

चंद्रपूर जिल्ह्यातील विधान परिषद निवडणूक बिनविरोध झाल्याचा उल्लेख करताना मुनगंटीवार यांनी, ''आता विकासकामांच्या बैठका पुन्हा सुरू करता येतील. मात्र निवडणूक आयोगाचा हा निर्णय लोकशाहीच्या दृष्टीने योग्य नाही,'' अशी भूमिका मांडली. यासंदर्भात केंद्र सरकारला पत्र पाठविणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

## 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके अमेरिकेतून भारतासाठी रवाना!

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसंस्था)- सोशल मीडियावर प्रचंड धुमाकूळ घालणाऱ्या 'कॉक्रोच जनता पार्टी'चे संस्थापक अभिजीत दीपके हे अमेरिकेतून भारतासाठी रवाना झाले आहेत. दिल्लीत शनिवार ६ जून रोजी आयोजित करण्यात आलेल्या एका मोठ्या विरोध प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी ते भारतात येत आहेत. भारतासाठी निघण्यापूर्वी त्यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट केली असून, 'मी भारतासाठी निघालो आहे. मी माझे भविष्य संविधानाच्या हाती सोपवतो, जय भीम!' असे त्यांनी म्हटले आहे.

अभिजीत दीपके शनिवारी सकाळी दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँड करतील. विमानतळावर उतरल्यानंतर ते थेट पार्लियामेंट स्ट्रीट पोलीस ठाण्यात जाणार असून जंतर-मंतर येथे आंदोलनासाठी अधिकृत परवानगीची मागणी करणार आहेत. कारण, या आंदोलनासाठी अद्याप दिल्ली पोलिसांकडून परवानगी मिळाल ेली नाही. 'नीट' पेपर लीक प्रकरण आणि सीबीएसई परीक्षा निकालांमधील गडबडीच्या विरोधात हे आंदोल न केले जात असून, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, अशी प्रमुख मागणी या पक्षाची आहे.

## मला मोदी खूप आवडतात. ते माझे खूप चांगले मित्र-डोनाल्ड ट्रम्प

### भारताने अनेक दशके अमेरिकेचा फायदा घेतला, आता आमची टॅरिफमधून बक्कळ कमाई

वॉशिंग्टन दि.६ (वृत्तसंस्था)- भारतासोबतच्या व्यापारासंदर्भात, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटले आहे की, भारताने बऱ्याच काळापासून अमेरिकेवर जास्त आयात शुल्क लादले आणि त्याचा फायदा घेतला. ट्रम्प यांनी दावा केला की, आता परिस्थिती बदलली आहे आणि अमेरिका भारताकडून मोठा नफा कमावत आहे. ट्रम्प पुढे म्हणाले की, अमेरिका आणि भारत यांच्यात लवकरच एक मोठा व्यापारी करार होऊ शकतो. ते म्हणाले, 'मला मोदी खूप आवडतात. ते माझे खूप चांगले मित्र आहेत. आमचे संबंध चांगले आहेत आणि आम्ही एकमेकांना खूप चांगल्या प्रकारे समजून घेतो.'

ट्रम्प यांचे हे विधान अशा वेळी आले आहे, जेव्हा अमेरिकेच्या एका पथकाने नुकतेच नवी दिल्लीत भारतीय सरकारी अधिकाऱ्यांसोबत अनेक फेऱ्यांची चर्चा केली आहे. व्यापाराशी संबंधित काही समस्या त्वरित सोडवण्यासाठी दोन्ही देश एका तात्पुरत्या व्यापारी करारावर एकमत करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारताच्या वाणिज्य मंत्रालयाने म्हटले आहे की, चर्चा



सकारात्मक झाली आहे आणि दोन्ही देशांना असा करार करायचा आहे, ज्यामुळे भारत आणि अमेरिका या दोघांनाही फायदा होईल. याचा अर्थ असा की, व्यापारी करार पुढे नेण्यासाठी दोन्ही बाजू अजूनही एकत्र काम करत आहेत.

करारावरील वाटाघाटींदरम्यान एक नवीन अडचण निर्माण झाली आहे. अमेरिकेने काही देशांवर अतिरिक्त आयात शुल्क (टॅरिफ) लावण्याचा प्रस्ताव दिला आहे. अमेरिकेचा दावा आहे की, हे देश सक्तीच्या मजुरीला प्रतिबंध करण्यासाठी पुरेशी पावले उचलत नाहीत. या प्रस्तावित यादीत भारताचा समावेश आहे. जर हा निर्णय लागू झाला, तर अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तूंवर १२.५ टक्के अतिरिक्त शुल्क (पान ४ वर)

## काँग्रेसचे किनवट उपविभागीय कार्यालयात पेरणी आंदोलन

किनवट दि.५ (प्रतिनिधी)- राज्यातील वाढती बेरोजगारी, महागाई, नीट परीक्षेचा घोटाळा, शेतकरी कर्जमाफी आणि आदिवासी समाजाच्या प्रलंबित प्रश्नांवर शासनाचे लक्ष वेधण्यासाठी नांदेड उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे यांच्या नेतृत्वाखाली किनवट येथे काँग्रेसचे डॉ. पुंडलिक आमले यांच्या पुढाकारातून बिरसा मुंडा चौकातून मोर्चा काढण्यात आला व उपविभागीय कार्यालय परिसरात पेरणी आंदोलन करण्यात आले.

काँग्रेसने निवेदनाद्वारे राज्यातील वाढत्या बेरोजगारीबाबत चिंता व्यक्त करत युवक-युवतींसाठी रोजगारनिर्मितीच्या ठोस योजना राबविण्याची मागणी केली. शेतकऱ्यांवरील वाढते आर्थिक संकट लक्षात घेऊन सरसकट कर्जमाफी देण्याची मागणीही करण्यात आली. तसेच परीक्षेतील कथित गैरव्यवहारांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस आणि जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींमुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक बजेट विस्कळीत होत असल्याने महागाई नियंत्रणासाठी (पान ४ वर)

## मान्सून महाराष्ट्राच्या वेशीवर; गोव्यात दाखल

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- मान्सून गुरुवारी केरळमध्ये दाखल झाला असून सध्या मान्सूनचा उत्तरेकडे प्रवास सुरू आहे. दरम्यान, मान्सूनचे शुक्रवारी गोव्याच्या काही भागात आगामन झाल्याची माहिती हवामान विभागाने दिली. सध्या मान्सून महाराष्ट्राच्या वेशीपर्यंत पोहोचला आहे. लवकरच तळकोकणात मान्सूनचे आगमन होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे राज्यवासियांना लवकरच उष्णतेपासून दिलासा मिळण्याची शक्यता आहे. सध्या मान्सूनची पुढील वाटचाल सुरू आहे.

सॅटेलाईट प्रतिमांमध्ये केरळ किनारपट्टी, कर्नाटक आणि गोव्याच्या संपूर्ण किनारपट्टीवर शुक्रवारी सकाळी दाट ढगांची दाटी दिसून येत होती. त्यामुळे हळूहळू मान्सून पुढे सरकत असल्याचे दिसून येत होते. दुपारी मान्सून कर्नाटक, तामिळनाडू तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये पुढे सरकल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली. यात मान्सूनने अरबी समुद्राच्या आणखी काही भागांसह गोव्यातील काही भागांतही प्रवेश केला आहे. पुढील २ ते ३ दिवसांत नैऋत्य मान्सून मध्य अरबी समुद्र, कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेशातील काही भाग, गोवा, तामिळनाडू तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागरातील उर्वरित भाग, ईशान्य बंगालच्या उपसागरातील आणखी काही भाग तसेच ईशान्य भारतातील काही राज्यांमध्ये आणखी पुढे सरकण्यासाठी हवामान स्थिती अनुकूल आहे, अशी माहिती भारतीय हवामान शास्त्र विभागाने दिली.

मान्सून गोव्यात दाखल झाला की मान्सूनच्या पुढील प्रवासाचा टप्पा हा तळकोकण मानला जातो. सध्या मान्सूनच्या पुढील प्रवासाच्या दृष्टीने हवामान स्थिती अनुकूल असून मान्सून हळूहळू पुढे सरकत आहे. लवकरच मान्सून राज्यात प्रवेश करणार असून त्यामुळे तळकोकणातील काही भागात पावसाची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे. हवामान विभागाने सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यांत वादळी पावसाची शक्यता व्यक्त केली असून या जिल्ह्यांना पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. तसेच कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग आदी भागांसह सातारा आणि सातारा घाट विभाग तसेच नाशिक, अहिल्यानगर, पुणे, सोलापूर, बीड, छत्रपती संभाजीनगर, धाराशिव, लातूर आणि नांदेड आदी भागातही वादळी पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे.

## सलग तिसऱ्यांदा रेपो रेट जैसे थे, आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रांची घोषणा

### गृहकर्जाचा हफ्ता जैसे थे राहणार

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी पतधोरण विषयक समितीच्या बैठकीनंतर रेपो रेट जाहीर केला. यावेळी त्यांनी गेल्या काही महिन्यात युद्धांमुळं निर्माण झालेली अनिश्चितता यासंदर्भात भाष्य केलं. सध्या निर्माण झालेल्या आर्थिक स्थितीचं सखोल विश्लेषण केल्यानंतर रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवत असल्याचं संजय मल्होत्रा यांनी जाहीर केलं. आरबीआयनं सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवत गृहकर्जदारांना दिलासा दिला आहे.

आरबीआयकडून रेपो रेट कायम ठेवला जाईल अशी अनेकांना आशा होती. त्यानुसार रेपो रेट ५.२५ टक्के कायम ठेवण्यात आला आहे. यामुळं व्याजदरात कोणतीही वाढ होणार नाही. आरबीआयनं पतधोरण जाहीर करताना सलग तिसऱ्यांदा रेपो रेट कायम ठेवल्यानं गृहकर्जदारांना मोठा दिलासा मिळाला आहे. रेपो रेट कमी न केल्यानं किवा त्यात वाढ न केल्यानं गृहकर्जाचा ईएमआय कायम राहणार आहे.

आरबीआयनं पतधोरण विषयक समितीच्या बैठकीत रेपो रेट स्थिर ठेवला आहे. आरबीआयचे गव्हर्नर संजय म्हलोत्रा यांनी जागतिक पातळीवर भूराजनैतिक संघर्षामुळं निर्माण झालेली अस्थिरता, सप्लाय चेनमध्ये निर्माण झालेले अडथळे आणि दबाव याशिवाय ऊर्जा साधनांचे वाढलेले दर याचा परिणाम विकासाच्या वेगावर झाला असून महागाईच्या अंदाजात वाढ झाल्याचं पाहायला मिळत आहे. पुरवठा तुटवड्याचा परिणाम चौथ्या तिमाहीत आणि त्यानंतर देखील कायम राहील. जागतिक संकटानंतर देखील देशातील रिटेल महागाई दर निश्चित टार्गेटच्या खाली असल्याचं देखील सांगण्यात आलं आहे.

## 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या आंदोलनाविरोधातील याचिका तातडीने ऐकण्यास दिल्ली उच्च न्यायालयाचा नकार

नवी दिल्ली दि.५ (वृत्तसस्था)- 'कॉक्रोच जनता पार्टी' या संघटनेतर्फे शनिवारी, ६ जून रोजी राजधानी दिल्लीत पुकारण्यात आलेल्या आंदोलनाविरोधात दाखल झालेली याचिका तातडीने ऐकण्यास दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी स्पष्ट नकार दिला.

या आंदोलनादरम्यान कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून प्रतिबंधात्मक पावले उचलण्याची आणि गर्दीवर नियंत्रण ठेवण्याची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. मात्र, न्यायालयाने यावर तातडीने सुनावणी देण्यास असमर्थता दर्शवली.

'सेव्ह इंडिया फाउंडेशन' नावाच्या स्वयंसेवी संस्थेने ही जनहित याचिका दाखल केली होती. न्यायमूर्ती सौरभ बॅनर्जी आणि न्यायमूर्ती अमित शर्मा यांच्या सुट्टीकालीन खंडपीठासमोर या याचिकेचा उल्लेख करत तातडीने सुनावणी घेण्याची विनंती करण्यात आली. परंतु, न्यायालयाने हे प्रकरण तातडीच्या यादीत समाविष्ट करण्यास नकार दिला.

याचिकेत समाजमाध्यमांवर फिरणाऱ्या काही व्हिडिओंचा संदर्भ देण्यात आला आहे. ''आंदोलकांनी विमानतळावर मोठ्या प्रमाणावर अडथळे निर्माण करावेत, तसेच पोलिसांच्या कारवाईला विरोध करण्यासाठी आणि स्वतःचा बचाव करण्यासाठी आधीच 'पेपर स्प्रे' (मिरचीची पूड असलेले स्प्रे) आणि लाठ्या-काठ्या सोबत बाळगाव्यात, असे आवाहन या व्हिडिओंमध्ये करण्यात आले आहे,'' असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. या आंदोलनामुळे दिल्लीतील कायदा व सुव्यवस्था धोक्यात येऊ शकते आणि सार्वजनिक शांतता भंग होऊ शकते, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली होती.

## पक्षादेश नसताना परस्पर उमेदवारी अर्ज मागे घेणाऱ्या उमेदवारांवर काँग्रेसकडून निलंबनाची कारवाई

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- राज्यात सध्या विधानपरिषद निवडणुकीची रणधुमाळी जोरात सुरू आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसने आता विधान परिषद निवडणुकीत परस्पर उमेदवारी अर्ज मागे घेणाऱ्या उमेदवारांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. यवतमाळचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार साहेबराव कांबळे आणि चंद्रपूरचे उमेदवार शैलेश अग्रवाल यांची काँग्रेस पक्षातून हकालपट्टी करण्यात आली आहे. प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशावरून साहेबराव कांबळे आणि शैलेश अग्रवाल यांना काँग्रेस पक्षातून निलंबित करण्यात आलं आहे.

यवतमाळ विधान परिषदेची निवडणुकीची चुरस जरी संपली असली तरी निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या ५ पैकी ४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याने यातील राजकीय नाट्यमय घडामोडींनी ही निवडणूक राज्यात चांगलीच चर्चेत राहिली. महाविकास आघाडीचे साहेबराव कांबळे, भाजपचे बंडखोर नितीन भुतडा यांच्यावर वरिष्ठ स्तरावरून आणलेला दबाव आणि अजित पवार गटाच्या साजिद बेग, अपक्ष सय्यद फारुख यांनी उमेदवारी मागे घेतल्याने शिंदे सेनेचे (पान ४ वर)

## विधान परिषद निवडणुकीत १५० कोटींचा घोडेबाजार

### उमेदवारांच्या माघारीसाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक व्यवहार, संजय राऊतांचा आरोप

मुंबई दि.५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील निवडणुकांमध्ये उमेदवारी अर्ज माघारीच्या शेवटच्या दिवशी मोठ्या राजकीय घडामोडी घडल्या. राज्यातील १७ जागांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत ५ जागा बिनविरोध झाल्या असून उर्वरित १२ जागांवर आता थेट लढती रंगणार आहेत. मात्र या सर्व घडामोडींनंतर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केलेल्या गंभीर आरोपांमुळे राज्याच्या राजकारणात मोठी चर्चा सुरू झाली आहे. बिनविरोध निवडीसाठी आणि उमेदवारांच्या माघारीसाठी मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

संजय राऊत यांनी समाजमाध्यमांवर प्रतिक्रिया देताना माघार प्रक्रियेवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले. त्यांनी दावा केला की, बिनविरोध निवडीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नांमध्ये आणि उमेदवारांना माघार घ्यायला लावण्यासाठी झालेल्या राजकीय हालचालींमध्ये एका दिवसात किमान १५० कोटी रुपये खर्च झाले. विरोधी पक्षातील काही उमेदवारांनी स्वतःचा भाव ठरवून व्यवहार केल्याचा आरोपही त्यांनी केला. कोकण, छत्रपती संभाजीनगर आणि पुणे येथे झालेल्या घडामोडी लोकशाहीसाठी घातक असल्याचे सांगत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर निशाणा साधला. या वक्तव्यानंतर राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे.

दरम्यान, अर्ज माघारीनंतर राज्यातील ५ जागा बिनविरोध झाल्या आहेत. या जागांमध्ये महायुतीने मोठे यश मिळवले असून दोन जागांवर शिवसेना शिंदे गट, दोन जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट आणि एका जागेवर भाजपचा विजय निश्चित झाला आहे. त्यामुळे मतदानाआधीच महायुतीने काही मतदारसंघांमध्ये आपले वर्चस्व सिद्ध केल्याचे चित्र दिसत आहे. या बिनविरोध निवडींमुळे अनेक ठिकाणी राजकीय समीकरणांबाबत नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

## माजी खासदार इम्तियाज जलील एसआयटीच्या रडारवर? निदा खान प्रकरणात चौकशीसाठी बोलावण्याची शक्यता

नाशिक दि.५ (प्रतिनिधी)- राज्यभरात खळबळ उडवून देणाऱ्या टीसीएस लैंगिक छळ आणि धर्मांतर प्रकरणात एक मोठी घडामोड समोर येत आहे. या प्रकरणातील मुख्य फरार आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याप्रकरणी एमआयएम पक्षाचे नगरसेवक मतीन पटेल यांची आत्तापर्यंत विशेष तपास पथकाकडून तीन वेळा कसून चौकशी करण्यात आली आहे. मतीन पटेल यांच्या जप्त केलेल्या मोबाईलमधून मिळालेल्या डेटाच्या आधारे अनेक धक्कादायक खुलासे समोर आले असून, या प्रकरणात आता माजी खासदार इम्तियाज जलील यांना देखील एसआयटीकडून चौकशीसाठी बोलवले जाण्याची शक्यता विश्वसनीय सूत्रांनी वर्तवली आहे.

या संवेदनशील आणि गंभीर गुन्ह्यामध्ये एसआयटीने आत्तापर्यंत एकूण आठ आरोपींना अटक केली असून, त्यांच्याविरुद्ध न्यायालयात मुख्य दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. मोबाईल डेटा आणि तांत्रिक तपासातून समोर आलेल्या नवीन पुराव्यांच्या आधारे, पोलीस येत्या काही दिवसांत न्यायालयात पुरवणी दोषारोपपत्र देखील दाखल करणार आहेत. दुसरीकडे, आरोपी निदा खानला घर मिळवून दिल्याच्या आरोपामुळे अडचणीत आलेल्या मतीन पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना माजी खासदार इम्तियाज जलील यांचे नाव या प्रकरणात जोडले जात असल्याच्या दाव्यांना पूर्णपणे फेटाळून लावले आहे. निदा खान ही इम्तियाज जलील यांची नातेवाईक असल्याचा आरोप साफ चुकीचा आणि निराधार आहे, असे पटेल यांनी स्पष्ट केले. एसआयटीच्या चौकशीदरम्यान निदा खानशी ओळख कशी झाली, यावर बोलताना मतीन पटेल म्हणाले की, ''निदा खानला मी यापूर्वी कधीही भेटलो नव्हतो. तिचे आई-वडील काही कौटुंबिक वादाचे कारण सांगत माझ्याकडे आले होते. ती गर्भवती असल्याने मानवी दृष्टिकोनातून मदत म्हणून मी तिच्या राहण्याची व्यवस्था केली होती. मी कोणतेही गैरकृत्य केलेले नाही,'' असे त्यांनी म्हटले.

# मुलांचे करिअर आणि पालकांची परीक्षा

दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करायला हवे.

मुलांच्या जीवनात दहावी आणि बारावीच्या परीक्षा अतिशय महत्त्वाच्या असतात. याच परीक्षा मुलांना त्यांच्या पुढील शिक्षणाच्या दिशा ठरवून देतात. त्यासाठी आता मुलांच्या परीक्षा संपल्या असल्या तरी पालकांच्या परीक्षा सुरू झाल्या आहेत असे म्हणता येईल. मुलांचे करिअर घडविताना मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहीत असतात. त्यामुळे आपल्या मुलांच्या करिअरची दिशा ठरवू शकतात. याचा परिणाम मुलांचा व पालकांचा वेळ, पैसा व श्रम वाचण्याला मदत होते. तो वेळ, पैसा व श्रम यांचा इतर ठिकाणी वापर करू शकतात. महत्त्वाची बाब म्हणजे, मुलांचे करिअर निवडताना पालकांना योग्य नियोजन करावे लागते. त्यासाठी दहावी आणि बारावीच्या परीक्षा मुलांच्या दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असतात. तेव्हा मुलांचे करिअर निवडताना पालकांनी मुलांवर सक्ती करू नये. त्यांच्या सुद्धा आवडीनिवडीचा विचार करावा. तेव्हा पालकांनी मुलांना दिलेल्या अधिकाराचा गैरवापर मुलांनी सुद्धा करू नये. त्याचबरोबर मुलांनी आपला शिक्षणाचा पाया मजबूत करण्यासाठी पालक अथक प्रयत्न करीत असतात, हे विसरून चालणार नाही. त्यासाठी मुले आणि पालक यांच्यात वेळच्यावेळी अभ्यासाच्या संदर्भात चर्चा होणे गरजेची आहे. डॉक्टरला वाटते माझी मुले डॉक्टर व्हावीत, वकिलाला वाटते माझी मुले वकील व्हावीत, शिक्षकाला वाटते माझी मुले शिक्षक व्हावीत, मात्र माझे असे मत आहे, ज्या क्षेत्राची आवड मुलांना असेल त्या क्षेत्रात त्यांनी करिअर करावे. तशा रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. म्हणजे मुले आणि पालक यांच्यामध्ये विचारविनिमय होणे गरजेचे आहे. शक्यतो भविष्याच्या दृष्टीने एक वाक्यता हवी. बरीच मुले नंतर पालकांना दोष देतात. काही मुले पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना मदत करत अभ्यास करतात आणि आपल्या स्वत:च्या पायावर उभे राहून आपल्या आवडीनिवडी पूर्ण करण्याचा प्रयत्न करतात. यात अनेक मुलांना यश आले आहे.

पालकांनी आपल्या मुलांच्या करिअरचा विचार करत असताना एक मित्र आणि मार्गदर्शक म्हणून आपली भूमिका मुलांसमोर मांडावी. तेव्हाच मुलांच्या खऱ्या अर्थाने जीवनाला सुरुवात होत असते. यातच पालकांची खरी परीक्षा असते. काही पालक करिअर मार्गदर्शक केंद्रावर आपल्या मुलांना घेऊन जातात. यामुळे कोणकोणत्या नोकरीच्या संधी उपलब्ध आहेत किंवा कोणत्या शाखेची निवड केल्यावर आपल्याला कोणत्या क्षेत्रात नोकऱ्या उपलब्ध होऊ शकतात याची पूर्वकल्पना मुलांना येते. त्यामुळे अभ्यासक्रम निवडणे सोपे जाते.

आता खऱ्या अर्थाने पालकांची परीक्षा सुरु झाल्याने आपल्या मुलांची आवडनिवड लक्षात घेऊन मुलांना त्यांचे करिअर निवडण्यासाठी मार्गदर्शन करावे. मात्र सक्ती करू नये. एखादा मार्ग कठीण वाटत असेल तर सोप्या भाषेत समजवून सांगा म्हणजे त्या क्षेत्रातील आवड निर्माण होऊन आपले करिअर करू शकतो. त्यासाठी योग्यवेळी करिअर मार्गदर्शनाची गरज असते. काही मुले आपल्या मित्राने जी शाखा निवडली त्यामुळे तो त्या शाखेकडे जातो, असे बऱ्याच मुलांचे चित्र आपल्याला पाहायला मिळते. करिअरच्या दृष्टीने मुलांना शाखा निवडणे, त्याविषयी मार्गदर्शन घेणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलांच्या जीवनात हा महत्त्वपूर्ण निर्णय असतो. त्यासाठी सेवक तत्त्वावर होणारी भरती रद्द करून सरळ सेवा भरती करणे जास्त हिताचे ठरणार आहे. आज अनेक मध्यमवर्गीय कुटुंबांची परिस्थिती गृहीत धरल्यास घरात एक व्यक्ती कमावणारी असते आणि चार लोक खाणारे असतात. त्यात अधूनमधून नातेवाइकांचा सुद्धा समावेश असतो. वाढत्या महागाईचा विचार केल्यास कंत्राटी पद्धतीमुळे त्यांचा जीव टांगणीला आलेला असतो. त्यामुळे आताच्या मुलांना योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. शासन स्तरावर देखील रोजगाराच्या वेगवेगळ्या नवीन संधी निर्माण करता आल्या पाहिजेत. असे असले तरी उन्हाळी सुट्टीत मजा करत असताना आतापासून आपली आवड लक्षात घेऊन करिअरचे नियोजन केले पाहिजे. जेणेकरून भविष्यात रोजगाराच्या संधी निर्माण होतील अशा क्षेत्राकडे वळावे. त्यासाठी विविध क्षेत्रांचा अभ्यास करावा लागेल. तसेच इयत्ता सातवी आणि आठवीत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी करिअरच्या दृष्टीने विचारविनिमय करावा. म्हणजे दहावी आणि बारावीनंतर पुढे काय करता येईल याचे उत्तर अधिक सुलभरीत्या त्यांना मिळू शकते. आपण पाहिले तर बऱ्याच वेळा मुले परीक्षेच्या काळात तणावग्रस्त असलेले दिसतात. अभ्यास नीट न झाल्याने पास होऊ की नापास याची मुलांना अधिकच भीती असते. तसेच या तणावाखाली येऊन अनेक मुले आत्महत्या करण्याचा पर्याय निवडतात, आपल्याला परीक्षेत कमी गुण मिळाले तर पुढे काय करायचे? असे अनेक प्रश्न मुलांना सतावत असतात. त्यामुळे मुलांना तणाव निर्माण होतो. अशावेळी पालकांनी मुलांना धीर दिला पाहिजे. परीक्षा काळात मुलांच्या अभ्यासासाठी घरात शांतता हवी. तसेच त्याने एकाग्रतेने अभ्यास करायला हवा असे वातावरण निर्माण केले गेले पाहिजे. मुलांच्या आहाराकडे आणि त्यांच्या विश्रांतीकडे लक्ष द्यावे. दहावी आणि बारावीच्या परीक्षा संपल्यानंतरचा काळ हा मुलांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. या काळात अनेकदा पालक मुलांवर पुढील शिक्षण किंवा करिअर निवडीबाबत दबाव टाकतात. मात्र, कितीही झाले तरी मुलांवर सक्ती करू नये. प्रत्येक मुलाची आवड, क्षमता आणि स्वप्ने वेगळी असतात, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. परीक्षा संपल्यानंतर काही काळ मुलांना मोकळा श्वास घेऊ द्यावा. त्यानंतर शांतपणे आणि खुलेपणाने पालक व मुलांनी एकत्र बसून पुढील वाटचालीबाबत चर्चा करावी. मुलांची एकमेकांशी वारंवार तुलना करणे टाळावे. मुलांना काय आवडते, त्यांची ताकद काय आहे, त्यांना कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे आहे हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. पालकांची भूमिका केवळ निर्णय लादण्याची नसून योग्य मार्गदर्शन करण्याची असते. मुलांना आपले करिअर निवडताना पालकांनी एक मार्गदर्शक म्हणून काम करावे. मुलांना विविध पर्यायांची माहिती देणे, त्यांचे फायदे-तोटे समजावून सांगणे आणि त्यांच्या निर्णयाला पाठिंबा देणे हे अधिक गरजेचे आहे. मुलांचे करिअर हा त्यांच्या आयुष्याचा दीर्घ प्रवास आहे. त्या प्रवासात योग्य दिशा दाखवणे, त्यांना आत्मविश्वास देणे आणि त्यांच्या निवडीचा आदर करणे हीच पालकांची खरी परीक्षा आहे.

# शिवराज्याभिषेक : स्वराज्याच्या सार्वभौमतेचा सुवर्णक्षण



भारतीय इतिहासात काही घटना अशा आहेत की ज्यांचे महत्त्व केवळ त्या काळापुरते मर्यादित राहत नाही, तर त्या पुढील अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. अशा घटनांपैकी एक अत्यंत महत्त्वाची आणि गौरवशाली घटना म्हणजे छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होय. ६ जून १६७४ रोजी रायगडाच्या पवित्र भूमीवर संपन्न झालेला हा सोहळा केवळ एका राजाच्या सिंहासनारोहणाचा कार्यक्रम नव्हता, तर तो हिंदवी स्वराज्याच्या सार्वभौमतेची जगासमोर झालेली अधिकृत घोषणा होती. या ऐतिहासिक प्रसंगाने महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक इतिहासाला नवे वळण दिले. अनेक शतकांपासून परकीय सत्तांच्या अधिपत्याखाली असलेल्या जनतेच्या मनात स्वाभिमान, आत्मविश्वास आणि स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित करणारा हा क्षण होता. म्हणूनच ६ जून हा दिवस महाराष्ट्रासाठी आणि संपूर्ण भारतासाठी अभिमानाचा, प्रेरणेचा आणि राष्ट्रभक्तीचा दिवस मानला जातो.

सतराव्या शतकातील भारताचा इतिहास पाहिला तर देशाची राजकीय परिस्थिती अत्यंत गुंतागुंतीची होती. दिल्लीतील मुघल सत्ता विस्ताराच्या शिखरावर होती. दक्षिणेत आदिलशाही, निजामशाही, कुतुबशाही यांसारख्या विविध सत्तांचे वर्चस्व होते. सामान्य जनता करांचा बोजा, अन्याय, अत्याचार आणि असुरक्षिततेच्या वातावरणात जीवन जगत होती. समाजामध्ये निराशा आणि परावलंबित्वाची भावना वाढीस लागली होती. अशा वेळी महाराष्ट्राच्या मातीत एक असे व्यक्तिमत्त्व उदयास आले ज्याने स्वराज्याचे स्वप्न पाहिले आणि ते प्रत्यक्षात साकार करून दाखविले. १९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवनेरी किल्ल्यावर जन्मलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांना माता जिजाऊंनी रामायण, महाभारत आणि भारतीय संस्कृतीतील आदर्शांचे संस्कार दिले. अन्यायाविरुद्ध लढण्याची आणि दुर्बलांचे रक्षण करण्याची प्रेरणा बालपणापासूनच त्यांच्या मनात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत लहान वयात स्वराज्य उभारणीचा संकल्प केला. त्या काळात स्वतंत्र राज्य निर्माण करणे ही अत्यंत कठीण गोष्ट होती. परंतु दृढनिश्चय, धाडस आणि जनतेवरील विश्वास यांच्या बळावर त्यांनी स्वराज्याचा पाया रचला. तोरणा किल्ला जिंकून त्यांनी स्वराज्याच्या स्थापनेची पहिली पायरी गाठली. त्यानंतर राजगड, पुरंदर, कोंढाणा, प्रतापगड, जावळी यांसारख्या अनेक प्रदेशांवर स्वराज्याचा झेंडा फडकला. अफजलखानाचा वध, शाहिस्तेखानावरील धाडसी हल्ला, सुरतेवरील मोहीम आणि आग्र्याहून केलेली थरारक सुटका या घटनांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कीर्ती संपूर्ण भारतभर पसरली. त्यांनी केवळ युद्धे जिंकली नाहीत, तर लोकांच्या मनात स्वराज्याची भावना निर्माण केली.

छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेले स्वराज्य प्रत्यक्षात स्वतंत्र होते. तथापि, त्या काळातील राजकीय आणि सामाजिक व्यवस्थेनुसार राज्यकर्त्याला सार्वभौम शासक म्हणून अधिकृत मान्यता मिळण्यासाठी राज्याभिषेक आवश्यक मानला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधकांकडून त्यांच्या क्षत्रियत्वाबाबत प्रश्न उपस्थित केले जात होते. तसेच स्वराज्याला स्वतंत्र राजकीय अस्तित्व प्राप्त झाले असले तरी त्याला अधिकृत स्वरूप देणे गरजेचे होते. त्यामुळे राज्याभिषेकाचा निर्णय घेण्यात आला. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता, तर तो राजकीय दृष्ट्याही अत्यंत महत्त्वाचा होता. राज्याभिषेकामुळे स्वराज्य हे कोणत्याही सुलतानाच्या किंवा बादशहाच्या अधिपत्याखाली नसून स्वतंत्र आणि सार्वभौम राज्य असल्याचे जगाला जाहीर होणार होते.

राज्याभिषेकाच्या तयारीसाठी मोठ्या प्रमाणावर नियोजन करण्यात आले. रायगड किल्ला सजविण्यात आला. संपूर्ण स्वराज्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. देशभरातील विद्वान, संत, पंडित, सरदार आणि मान्यवरांना निमंत्रित करण्यात आले. काशीचे प्रसिद्ध वेदपंडित गागाभट्ट यांना राज्याभिषेक विधीचे प्रमुख म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वंशावळीचा अभ्यास करून त्यांना क्षत्रिय असल्याचे प्रमाणित केले. त्यामुळे राज्याभिषेकास धार्मिक आणि सामाजिक मान्यता प्राप्त झाली.

राज्याभिषेकासाठी अनेक दिवस यज्ञ, हवन, पूजा आणि धार्मिक विधी सुरू होते. रायगडावर हजारो लोक जमले होते. प्रत्येकाच्या मनात उत्सुकता आणि अभिमानाची भावना होती. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर स्वराज्याला अधिकृत स्वरूप प्राप्त होणार होते.

६ जून १६७४ रोजी पहाटे राज्याभिषेकाचा मुख्य सोहळा पार पडला. त्यानंतर सुवर्णसिंहासनावर त्यांना विराजमान करण्यात आले. त्या क्षणी रायगडाच्या भूमीवर इतिहास घडत होता. अनेक शतकांनंतर भारतीय भूमीवर एका स्वतंत्र हिंदवी राज्याच्या सार्वभौम राजाचा राज्याभिषेक होत होता. हा क्षण महाराष्ट्राच्या इतिहासातील सर्वांत अभिमानास्पद क्षणांपैकी एक मानला जातो.

राज्याभिषेकामुळे छत्रपती शिवाजी महाराजांना धार्मिक, सामाजिक आणि राजकीय मान्यता मिळाली. त्यांच्या सत्तेला वैधानिक स्वरूप प्राप्त झाले. स्वराज्याचा स्वतंत्र शासक म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. याच वेळी स्वतंत्र राजमुद्रा स्वीकारण्यात आली. राजमुद्रेवरील श्लोक स्वराज्याच्या तत्त्वज्ञानाचे प्रतीक होता. प्रतिपदेच्या चंद्रकोरीप्रमाणे वाढणारे आणि लोककल्याणासाठी कार्य करणारे राज्य ही त्यामागील संकल्पना होती.

राज्याभिषेकानंतर छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासन अधिक मजबूत केले. अष्टप्रधान मंडळाची रचना अधिक प्रभावीपणे कार्यरत झाली. पेशवा, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत, सेनापती, न्यायाधीश आणि पंडितराव या आठ प्रमुख पदांमार्फत राज्यकारभार चालविला जात होता. प्रत्येक विभागाची स्पष्ट जबाबदारी निश्चित करण्यात आली होती. शासनातील पारदर्शकता, कार्यक्षमता आणि उत्तरदायित्व यांना प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे स्वराज्याची प्रशासनव्यवस्था त्या काळातील इतर राज्यांच्या तुलनेत अधिक प्रभावी ठरली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्यकारभार लोककल्याणकारी होता. त्यांनी शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. जमिनीचे मोजमाप करून न्याय्य महसूल पद्धती लागू केली. शेतकऱ्यांवर अतिरिक्त करांचा भार टाकला गेला नाही. दुष्काळ किंवा संकटाच्या काळात त्यांना मदत पुरविण्यात आली. त्यामुळे स्वराज्यातील कृषीव्यवस्था मजबूत झाली. जनतेच्या कल्याणासाठी शासन असावे, ही त्यांची भूमिका होती. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना 'रयतेचा राजा' असे संबोधले जाते. स्त्रियांच्या सन्मानाचे रक्षण हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य होते. युद्धात शत्रूपक्षातील स्त्रियांनाही सन्मानाने वागणूक दिली जात असे. महिलांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली जात होती. त्या काळात स्त्रियांच्या सुरक्षेला विशेष महत्त्व देणारा असा दृष्टिकोन अत्यंत दुर्मीळ होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन आधुनिक आणि प्रगत मानला जातो.

धार्मिक सहिष्णुता हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे आणखी एक वैशिष्ट्य होते. त्यांनी कोणत्याही धर्माचा द्वेष केला नाही. त्यांच्या सैन्यात आणि प्रशासनात विविध धर्मांचे लोक कार्यरत होते. मशिदी, दर्गे आणि मुस्लिम धर्मीयांच्या धार्मिक स्थळांचे संरक्षण करण्यात आले. त्यांचा संघर्ष कोणत्याही धर्माविरुद्ध नव्हता, तर अन्यायकारक आणि अत्याचारी सत्तेविरुद्ध होता. त्यामुळे स्वराज्य हे सर्वधर्मसमभाव आणि न्याय यांवर आधारित होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी संरक्षणव्यवस्थेतही अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. त्यांनी किल्ल्यांचे सशक्त जाळे उभारले. प्रत्येक किल्ल्याचे सामरिक महत्त्व लक्षात घेऊन त्यांचा विकास केला. गनिमी कावा ही युद्धपद्धती प्रभावीपणे वापरून त्यांनी बलाढ्य शत्रूंना पराभूत केले. त्यांचे सैन्य शिस्तबद्ध, प्रशिक्षित आणि निष्ठावान होते. याशिवाय त्यांनी सागरी सुरक्षेलाही विशेष महत्त्व दिले. सिंधुदुर्ग, विजयदुर्ग आणि सुवर्णदुर्ग यांसारखे जलदुर्ग बांधून त्यांनी आरमाराची उभारणी केली. भारतीय इतिहासात सशक्त नौदल निर्माण करणाऱ्या शासकांमध्ये त्यांचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते.

राज्याभिषेकामुळे स्वराज्याला नवीन ऊर्जा प्राप्त झाली. मराठा साम्राज्याच्या विस्ताराला गती मिळाली. पुढील काळात मराठा सत्ता महाराष्ट्राबाहेरही विस्तारली. स्वराज्याची संकल्पना संपूर्ण भारतात पोहोचली. अनेकांना अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा मिळाली. त्यामुळे शिवराज्याभिषेक हा केवळ महाराष्ट्राच्या इतिहासातील नव्हे, तर भारतीय राष्ट्रचेतनेच्या इतिहासातीलही एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा सांस्कृतिक प्रभावही मोठा होता. मराठी भाषा, साहित्य, कला आणि संस्कृतीला नवसंजीवनी मिळाली. प्रशासनात मराठी भाषेचा वापर वाढला. स्थानिक परंपरा आणि सांस्कृतिक मूल्यांना प्रोत्साहन मिळाले. स्वराज्याच्या स्थापनेमुळे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेला नवे बळ प्राप्त झाले. आजही महाराष्ट्रातील लोकजीवनात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्थान अत्यंत आदराचे आहे.

आधुनिक काळात शिवराज्याभिषेक दिनाचे महत्त्व अधिक व्यापक झाले आहे. आज भारत एक लोकशाही राष्ट्र आहे. लोकशाहीतील अनेक मूल्ये जसे की सुशासन, लोककल्याण, न्याय, समानता आणि उत्तरदायित्व यांची झलक छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्यात दिसून येते. त्यांनी दाखविलेला आदर्श आजच्या प्रशासकांसाठी, राजकारण्यांसाठी आणि समाजनेत्यांसाठी मार्गदर्शक ठरू शकतो. भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, स्त्रियांचा सन्मान, सामाजिक समता आणि राष्ट्रीय एकात्मता यांसारख्या मूल्यांची आजही समाजाला गरज आहे.

दरवर्षी ६ जून रोजी महाराष्ट्रासह देशभरात शिवराज्याभिषेक दिन उत्साहात साजरा केला जातो. रायगडावर विशेष सोहळ्यांचे आयोजन केले जाते. हजारो शिवभक्त, इतिहासप्रेमी आणि पर्यटक रायगडावर जाऊन महाराजांना अभिवादन करतात. विविध ठिकाणी व्याख्याने, प्रदर्शन, पोवाडे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि ऐतिहासिक मिरवणुका आयोजित केल्या जातात. या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत शिवचरित्र पोहोचविण्याचे कार्य केले जाते.

आजच्या युवकांसाठी शिवराज्याभिषेक दिन विशेष प्रेरणादायी आहे. नेतृत्व, संघटनकौशल्य, धैर्य, दूरदृष्टी, प्रामाणिकपणा आणि राष्ट्रनिष्ठा या गुणांचे महत्त्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनातून शिकता येते. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही हार मानली नाही. संकटांना संधीमध्ये बदलून त्यांनी स्वराज्याची उभारणी केली. हीच प्रेरणा आजच्या तरुणांना जीवनातील आव्हानांचा सामना करण्यासाठी उपयोगी ठरू शकते.

छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य केवळ ऐतिहासिक गौरवापुरते मर्यादित नाही. त्यांच्या विचारांमध्ये आधुनिक समाजासाठीही मार्गदर्शन आहे. समाजातील दुर्बल घटकांचे संरक्षण, स्त्रियांचा सन्मान, पर्यावरणाबाबत जागरूकता, न्यायनिष्ठ प्रशासन आणि राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देणे ही त्यांची शिकवण आजही तितकीच उपयुक्त आहे. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराजांना केवळ इतिहासातील महान राजा म्हणून नव्हे, तर एक आदर्श राष्ट्रपुरुष म्हणून स्मरण केले जाते.

छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक हा भारतीय इतिहासातील स्वाभिमान, स्वातंत्र्य आणि लोककल्याण यांचा विजय होता. रायगडावरील त्या सुवर्णक्षणाने महाराष्ट्राला सार्वभौम नेतृत्व दिले, जनतेला आत्मविश्वास दिला आणि भारतीय इतिहासाला नवी दिशा दिली. ६ जून हा दिवस आपल्याला केवळ भूतकाळातील वैभवाची आठवण करून देत नाही, तर वर्तमान आणि भविष्य घडविण्यासाठी आवश्यक असलेल्या मूल्यांची जाणीवही करून देतो.

शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला, त्यांच्या अद्वितीय नेतृत्वाला आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेला अभिवादन करतो. स्वाभिमान, न्याय, लोककल्याण, राष्ट्रप्रेम आणि सर्वधर्मसमभाव या मूल्यांचे जतन करूनच आपण त्यांच्या कार्याचा खरा वारसा पुढे नेऊ शकतो. रायगडावर झालेला राज्याभिषेक हा इतिहासातील एक प्रसंग असला, तरी त्यातून मिळणारी प्रेरणा चिरंतन आहे. जोपर्यंत स्वराज्य, स्वातंत्र्य आणि न्याय या मूल्यांवर मानवाचा विश्वास राहील, तोपर्यंत छत्रपती छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि त्यांचा तेजस्वी वारसा भारतीय जनमानसात अजरामर राहील.

–डॉ. राजेंद्र बगाटे

(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी

**छत्रपती** शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला. त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो. छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार, भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी, गरीबी यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे. त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे 'भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा' यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.

शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवांसाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दु:खात सहभागी व्हायला पाहिजे. १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला.त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात. महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व, त्यांचा त्याग, रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते.ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे 'राज्याभिषेक सोहळा'घराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंत:करणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे. यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या, भुकेलेल्यांना अन्न, रोजगार याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे.शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.१९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते. कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वत: बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे.यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर आहे.कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल. कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती.आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते.हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वत: डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले. अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो.देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा. यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे. यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे. ६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदूषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.शिवरायांना माझा मानाचा मुजरा. - जय शिवाजी, हर हर महादेव.

– रमेश कृष्णराव लांजेवार

## प्रकाश प्रदूषण ..

प्रकाश प्रदुषणावर पडाया हवा प्रकाश
माहीत ना कित्येका दुषीत होते आकाश

दुर्लक्षित हे प्रदुषण छुपेपणे करे विनाश
पशू पक्षां होई त्रास घेताना मोकळाश्वास

हवामानावर परिणाम हो पर्यावरणा -हास
अडचणीसामना करे खगोलशास्त्रअभ्यास

मानव निर्मित प्रकाश बिघडू टाके अवकाश
जन जागृती जरुरीची जाण होईलं अवकाश

कृत्रिम प्रकाश वापरा काळजी हवी हमखास
पिवळ्यालाल दिव्याने अल्प होणारं तो नाश

खगोल पर्यटणपरिषद ये विषय चर्चेला खास
उपाय योजना करुनि वाचवा समस्त जगास

– हेमंत मुसरीफ पुणे

# १८ वर्षांनंतर राजा बाजार जैन मंदिरात आचार्य श्री सिद्धांत सागरजी महाराज ससंघ यांचे मंगल आगमन

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – समस्त जैन समाजासाठी अत्यंत आनंद, उत्साह आणि आध्यात्मिक उन्नतीचा दुमिळ योग लाभला असून परम पूज्य आचार्य श्री १०८ सिद्धांत सागरजी महामुनिराज (११ पिच्छी) ससंघ यांचे तब्बल १८ वर्षांनंतर छत्रपती संभाजीनगर येथील राजा बाजार दिगंबर जैन मंदिरात मंगल आगमन होत आहे. हा ऐतिहासिक सोहळा संपूर्ण समाजासाठी श्रद्धा, भक्ती, संयम आणि धर्माआराधनेची पर्वणी ठरणार आहे.

दि. ६ जून रोजी सकाळी ६ वाजता आचार्य श्री देशमुख नगर येथून मंगल विहारास प्रारंभ करणार आहेत. सकाळी ७ वाजता मोढा नाका येथे त्यांचे भव्य स्वागत करण्यात येणार असून, सकाळी ७.१५ वाजता किराणा चौडी चौक परिसरात भव्य गुरु-मिलन सोहळा संपन्न होणार आहे. या मंगल प्रसंगी गणिनी आर्यिका श्री १०५ विमलप्रभा माताजी (४ पिच्छी) ससंघ तसेच आर्यिका श्री वीहेनश्री माताजी (५ पिच्छी) ससंघ यांचेही मंगल मिलन होणार आहे. त्यानंतर सकाळी ७.३० वाजता राजा बाजार दिगंबर जैन मंदिरात आचार्य श्रींचा मंगल प्रवेश व भव्य स्वागत सोहळा संपन्न होईल.

**दि. ६ जूनचे प्रमुख कार्यक्रम–** सकाळी ७.३० वाजता – श्रीजींचा पंचामृत अभिषेक, सकाळी ८.१५ वाजता – आचार्य श्री व माताजींचे मंगल प्रवचन, सकाळी ९.३० वाजता – आहारचर्या, दुपार व सायंकाळी – विविध धार्मिक, सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रम तसेच आनंद यात्रा, संतसंघाचा मुक्काम, आचार्य श्री सिद्धांत सागरजी महाराज ससंघ – चंद्रसागर दिगंबर जैन धर्मशाळा, शाहगंज, गणिनी आर्यिका श्री विमलप्रभा माताजी ससंघ – त्यागी भवन, राजा बाजार, आर्यिका श्री वीहेनश्री माताजी ससंघ – राजा बाजार दिगंबर जैन मंदिर, आहारचर्येचा पुण्यलाभ मिळिवण्यासाठी सर्व श्रावक कुटुंबांनी आपल्या निवासस्थानी चौका लावावा, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच सामूहिक पंचायती चौक्याची व्यवस्था चंद्रसागर दिगंबर जैन धर्मशाळा परिसरात उपलब्ध करून देण्यात आली आहे.

**दि. ७ जूनचे कार्यक्रम–** सकाळी ६.३० वाजता – श्री पार्श्वनाथ विधान, सकाळी ७.३० वाजता – श्रीजींचा पंचामृत अभिषेक, सकाळी ८.३० वाजता – आचार्य श्री व माताजींचे मंगल प्रवचन, हे भव्य विधान छत्रपती संभाजीनगरातील विविध महिला मंडळांच्या सहभागातून परम पूज्य आचार्य श्री सिद्धांत सागरजी महाराज, गणिनी आर्यिका श्री विमलप्रभा माताजी व आर्यिका श्री वीहेनश्री माताजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होणार आहे.

**दि. ८ जूनचा विशेष कार्यक्रम–** परम पूज्य भक्तामर महोदयी आचार्य श्री १०८ विनम्र सागरजी गुरुदेव यांच्या २४ व्या दीक्षा महोत्सवानिमित्त सकाळी ६.३० वाजल्यापासून राजा बाजार दिगंबर जैन मंदिरात गुरु पूजनाचा भव्य कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. याच प्रसंगी आचार्य श्री विनम्र सागरजी गुरुदेव यांना समर्पित विनयांजली सभेचेही आयोजन करण्यात आले आहे.

यानंतर आचार्य श्री सिद्धांत सागरजी महाराज ससंघ यांचा अरिहंत नगरकडे मंगल विहार होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे दि. ६, ७ आणि ८ जून रोजीचे सर्व कार्यक्रम भक्ती, संगीत आणि अध्यात्माच्या मंगलमय वातावरणात संपन्न होणार आहेत. समाजातील युवक-युवती, महिला मंडळे, श्रावक-श्राविका तसेच सर्व धर्मप्रेमी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मलाभ घ्यावा, असे आवाहन श्री खंडेलवाल दिगंबर जैन पंचायत, पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिर, राजा बाजार यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अठरा वर्षांनंतर लाभलेला हा दुमिळ आणि ऐतिहासिक आध्यात्मिक योग संपूर्ण समाजासाठी अविस्मरणीय पर्व ठरणार आहे. तरी सर्व सम ाजबांधवांनी या त्रिदिवसीय धार्मिक महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होऊन धर्म, संस्कार आणि अध्यात्माचा लाभ घ्यावा, असे आवाहन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा तसेच विश्वस्त मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे. ही माहिती प्रचार-प्रसार संयोजक नरेंद्र अजमेरा व पियुष कासलीवाल यांनी प्रसिद्धीस दिली.

# 'गो-ग्रीन'मध्ये साडेचार लाख वीजग्राहकांची वर्षाला साडेपाच कोटींची बचत

## महावितरणच्या पर्यावरणस्नेही उपक्रमाला मराठवाड्यात प्रतिसाद

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – मराठवाड्यातील ४ लाख ४७ हजार ९५६ लाख पर्यावरणस्नेही वीजग्राहकांनी छापील कागदाचा पूर्णपणे वापर बंद करीत पेपरलेस वीजबिलास पसंती दिली आहे. महावितरणच्या 'गो-ग्रीन' उपक्रमात या ग्राहकांना वार्षिक ५ कोटी ३७ लाख ५४ हजार रुपयांचा थेट फायदा होत आहे.

महावितरणकडून पर्यावरणपूरक 'गो-ग्रीन' योजनेतून वीज बिलासाठी छापील कागदाचा वापर कमी करण्यावर भर देण्यात आला आहे. कागदी बिलाऐवजी फक्त 'इमेल' व 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलाम ध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईलवर 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. यासह महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर चालू वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे. महावितरणच्या गो-ग्रीन उपक्रमात ग्राहकांना वार्षिक १२० रुपये सवलत मिळत आहे. छापील बिल टाळून ई-बिल घेतल्याने ग्राहकांना प्रॉम्प्ट पेमेंट व ऑनलाईन बिल भरणा सवलत सहज मिळते. सर्व

| जिल्हा | ग्राहक | वार्षिक बचत (रुपयांत) |
|---|---|---|
| बीड | ५१,२५२ | ६१,५०,२४० |
| छत्रपती संभाजीनगर | १,६२,३८९ | १,९४,८६,६८० |
| धाराशिव | ३७,७०५ | ४५,२४,६०० |
| हिंगोली | १२,५४१ | १५,०४,९२० |
| जालना | २८,७९६ | ३४,५५,५२० |
| लातूर | ६७,५०८ | ८१,००,९६० |
| नांदेड | ५६,६७७ | ६८,०१,२४० |
| परभणी | ३१,०८८ | ३७,३०,५६० |
| **एकूण मराठवाडा** | ४,४७,९५६ | ५,३७,५४,७२० |

वीजग्राहकांनी या पर्यावरणपूरक उपक्रमात सहभागी व्हावे.

**– आदित्य जीवने (भाप्रसे),**
सहव्यवस्थापकीय संचालक, महावितरण, छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक कार्यालय

# प्रस्तावित देवस्थान इनाम निर्मूलन कायद्यात मराठवाड्याचा समावेश करण्याची मागणी

## छत्रपती संभाजीनगरात गोसावी समाजाचे एक दिवशीय धरणे आंदोलन संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – मराठवाड्यातील हजारो इनामदार व भोगवटदार कुटुंबांना जमिनीच्या मालकी हक्कापासून न्याय मिळावा आणि त्यांना प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम-२०२६' अंतर्गत समान न्याय मिळावा, या मागणीसाठी ५ जून २०२६ रोजी विभागीय महसूल आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे एकदिवसीय धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

या आंदोलनाला मराठवाडा इनाम जमीन हक्क परिषद महाराष्ट्र, भटक्या विमुक्त दशनाम गोसावी समाज परिषद, बीड, अखिल भारतीय दशनाम गोसावी समाज उन्नती मंडळ परभणी, दशनाम गोसावी समाज उत्कर्ष मंडळ लातूर, दशनाम गोसावी संघ धाराशिव, दशनाम गोसावी समाज संस्था जालना, नांदेड जिल्हा गोसावी समाज संघ, दशनाम गोसावी समाज मराठवाडा महासंघ, दशनाम गोसावी समाज संस्था छत्रपती संभाजीनगर, दशनाम गोसावी समाज सं हिंगोली, ब्राह्मण पुरोहित पुजारी महासंघ बीड, जैन पुजारी पुरोहित महासंघ, अखिल गुरव समाज संघटना, वैष्णव बैरागी संघ, नाथपंथी गोसावी संघटना, मराठा समाज देवस्थान पुजारी महासंघ तसेच गोसावी सेना महाराष्ट्र राज्य यांचा सक्रिय पाठिंबा लाभला आहे.



संघटनांच्या म्हणण्यानुसार, शासनाच्या नवीन प्रस्तावित अधिनियमामध्ये महाराष्ट्रातील इतर भागांतील धार्मिक व धर्मादाय संस्थांच्या इनाम जमिनींसाठी विविध सवलती व हक्कांची तरतूद करण्यात आली आहे. मात्र मराठवाड्यातील मूळ इनामदारांना त्यातून वगळण्यात आले असून, हा गंभीर अन्याय आहे. हैदराबाद संस्थानाच्या विलीनीकरणाच्या काळात मोठा त्याग करूनही मराठवाड्यातील इनामदारांना आजपर्यंत जमिनींचा मालकी हक्क मिळालेला नाही. १९६० दशकात मराठवाडयातील काही देवस्थान इनाम जमीन (खिदमत मास) नाममात्र नजराणा घेऊन वर्ग १ मध्ये रुपांतरीत केल्या. तसेच काही देवस्थान इनाम जमीन अंशतः वर्ग एक मध्ये आहेत. तसेच २०२५ मध्ये राज्य शासनाने इतर काही जिल्ह्यांमध्ये आसपास तत्कालीन जिल्हाधिकारी कार्यालयाने काही इनाम जमीन खालसा केल्या आहेत तय संबंधित फेर झाले आहेत. त्याच धर्तीवर संपूर्ण महाराष्ट्र राज्यात देवस्थान इनाम जमीन संदर्भात एकसुत्री पणाने कायद्यातील मसुद्यामधे सुधारणा करावी. इनामदार शेतकरी असूनही त्यांना पीक विमा, कृषी अनुदान, नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई आणि इतर शासकीय योजनांचा लाभ मिळत नसल्याने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

संघटनांनी प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन अधिनियम-२०२६'चे स्वागत करताना, मराठवाडा विभागालाही या कायद्याच्या कक्षेत समाविष्ट करून संपूर्ण राज्यात समान न्याय लागू करण्याची मागणी केली आहे. तसेच इनाम जमिनींवर बेकायदेशीर ताबा मिळिवणाऱ्या भूमाफियांवर कठोर कारवाई, बोगस कागदपत्रे रद्द करणे आणि मूळ हक्कधारकांना न्याय देण्याच्या तरतुदींना त्यांनी पाठिंबा दर्शविला आहे. मराठवाड्यातील इनाम दारांना या नवीन कायद्यांतर्गत समान न्याय न मिळाल्यास राज्यभर तीव्र आंदोलन, उपोषण व लोकशाही मार्गाने संघर्ष उभारण्याचा इशाराही राज्य समन्वयक ओमप्रकाश गिरी, अँड राजेंद्र बन व दत्ता महाराज गिरी, अँड जगदेव गिरी साहेब, संपत्ती पुरी महाराज, डॉ. मकरंद गिरी सर, यांनी संघटनेच्या वतीने दिला आहे.

# पद्मपुरा भागातील १९ वर्षीय तरुणी बेपत्ता

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – येथील नवीनवस्ती, काकाचौक, पद्मपुरा भागात राहणारी १९ वर्षीय युवती घरातून कॉलेजला जाते असे सांगून निघून गेली असून ती अद्याप घरी परतलेली नाही. याप्रकरणी वेदांतनगर पोलीस ठाण्यात ती बेपत्ता (मिसिंग) असल्याची नोंद करण्यात आली आहे.



तक्रारदार विनोद शंकर देवरे यांनी ५ जून रोजी वेदांतनगर पोलीस स्टेशनला दिलेल्या माहितीनुसार, त्यांची मुलगी अक्षदा विनोद देवरे (वय १९ वर्ष, व्यवसाय- शिक्षण)ही घरात कोणालाही काहीही न सांगता निघून गेली आहे. नातेवाईक आणि परिचित ठिकाणी शोध घेतला असता ती मिळून आली नाही.

बेपत्ता तरुणीचे वय१९ वर्षे,उंची: ५ फूट ५ इंच, रंग:काळा-सावळा, नाक सरळ व डोळे काळे, केस लांब आणि काळे असून, शर्ट आणि सलवार , पायात गुलाबी रंगाची सँडल. घातलेली असून या वर्णनाची युवती कोणास आढळून आल्यास किंवा तिच्याबाबत काही माहिती मिळाल्यास तातडीने वेदांतनगर पोलीस स्टेशन,फोन नं. ०२४०-२३५१३३३येथे किंवा पोलीस हवालदार पी.एस. शिरसाठ यांच्याशी ९८५०४५०१६७ संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# साईनाथ मोरे या बेपत्ता व्यक्तीचा शोध

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – न्यु पंजाब हॉटेल रेल्वेस्टेशन सुरक्षा बिल्डिंग नं .०४ रुम नं.५०८ शास्त्री नगर वासी नाका चेंबूर मुंबई येथे राहणारा ५० वर्षीय इसम कोणास काहीही न सांगता निघून गेली आहे. याबाबत वेदांतनगर पोलिसांत मिसिंग नोंद करण्यात आली आहे. याबाबत तक्रारदार अभिषेक साईनाथ मोरे, राहणार सुरक्षा बिल्डिंग नं .४ रुम नं.५०८ शास्त्री नगर वासी नाका चेंबूर मुंबई यांनी दिनांक २८मे २०२६ रोजी वेदांत नगर पो.स्टे ला तक्रार दिली आहे.यात, त्यांचे वडील साईनाथ विश्वनाथ मोरे (वय ५० वर्ष) धंदा-नोकरी रा.सुरक्षा बिल्डिंग नं ४. रुम नं ५०८ शास्त्री नगर वासी नाका चेंबूर मुंबई हा घरात कोणास काही न सांगता घरातून निघून गेला आहे. त्याचा शोध घेतला तो मिळून आला नाही.



बेपत्ता इसमाचे वर्णन याप्रमाणे- नाव-साईनाथ विश्वनाथ मोरे, उंची-५ फुट ३ इंच, रंग-सावळे, नाक-सरळ, डोळे-काळे, केस-पांढरे, अंगात पोषाख-शर्ट लाल, पँट निळी, पायात - चप्पल, पायात अपघात झाल्याने गुडघ्यामध्ये रॉड आहे. वरील वर्णनाचा इसम आढळल्यास वेदांतनगर पोलीस स्टेशनला फोन नं-०२४०-२३५१३३३, येथे हवलदार के.पी गुमरे मोबाईल क्रमांक९८२३४९९२५३ यावर माहिती द्यावी असे आवाहन प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले.

# जनगणना कामातील उत्कृष्टतेचा सन्मान; मनपा झोन ३ मध्ये शेख अब्दुल रहीम प्रथम, विशेष गौरवाने सत्कार

छत्रपती संभाजीनगर, दि. ५ (प्रतिनिधी) – महानगरपालिका (AMC) अंतर्गत झोन क्रमांक ३ मध्ये राष्ट्रीय म हत्त्वाच्या जनगणना कार्यात उत्कृष्ट आणि दर्जेदार कामगिरी केल्याबद्दल कर्मचारी गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यामध्ये शेख अब्दुल रहीम यांनी झोन ३ मध्ये प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. त्यांच्या या कामगिरीबद्दल मनपा प्रशासनाच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

शहर जनगणना प्रमुख तथा उपआयुक्त अर्पणा थेटे, सहाय्यक आयुक्त व झोन ३ चे चार्ज ऑफिसर शेख रफिक तसेच जनगणना विभागाचे सहायक आयुक्त गोविंद बारबोटे यांच्या हस्ते हा सन्मान सोहळा पार पडला.

**दर्जेदार कामगिरीची दखल**

जनगणना कार्य वेळेत, अचूकतेने आणि प्रभावीपणे पूर्ण केल्याबद्दल शेख अब्दुल रहीम यांच्यासह त्यांच्या सुपरवायझर फसाहत अफशा खान यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले. झोन ३ अंतर्गत त्यांनी केलेल्या उल्लेखनीय कामाची दखल घेत मनपा प्रशासनाने हा सन्मान प्रदान केला.

**'हा बहुमान आमच्या परिश्रमांची पोचपावती'**

या सन्मानाबद्दल भावना व्यक्त करताना शेख अब्दुल रहीम म्हणाले, यापूर्वीही माझ्या कार्याची दखल घेत महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते मला सन्मानित करण्यात आले होते. आज पुन्हा मिळालेला हा गौरव आमच्यासाठी अभिमानाचा क्षण आहे. हा बहुमान आमच्या अविरत परिश्रमांची पोचपावती असून भविष्यात आणखी जोमाने आणि जबाबदारीने काम करण्याची प्रेरणा देणारा आहे. या यशाबद्दल आम्ही सर्वोच्च अल्लाहचे मनःपूर्वक आभार मानतो.

**प्रशासनाकडून कौतुक–**

यावेळी उपआयुक्त अर्पणा थेटे, सहाय्यक आयुक्त शेख रफिक आणि सहायक आयुक्त गोविंद बारबोटे यांनी शेख अब्दुल रहीम व त्यांच्या टीमचे विशेष कौतुक केले. महानगरपालिकेतील इतर कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन उत्कृष्ट व गतिमान कामगिरी करावी आणि मनपाचा नावलौकिक वाढवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. शेख अब्दुल रहीम आणि त्यांच्या टीमला मिळालेल्या या सलग सन्मानामुळे झोन ३ परिसरात आनंदाचे वातावरण असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जनगणना कार्यातील उत्कृष्टता आणि समर्पणाचा हा गौरव इतर कर्मचाऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

# मा. लोकेश चंद्र यांना महा आयकॉन पुरस्कार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते प्रदान



छत्रपती संभाजीनगर : मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांचा विजेच्या क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल 'महा आयकॉन २०२६' हा जीवनगौरव पुरस्कार देऊन 'पुढारी' माध्यम समूहातर्फे गौरव करण्यात आला.

केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्गमंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते मुंबईत गुरुवारी हा पुरस्कार देण्यात आला. राज्याचे उद्योगमंत्री श्री. उदय सामंत, प्रसिद्ध शास्त्रज्ञ श्री. अनिल काकोडकर, पुढारी समुहाचे मुख्य संपादक श्री. प्रतापसिंह जाधव आणि संपादक श्री. योगेश जाधव मंचावर उपस्थित होते. महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीत आणि राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी 'पुढारी' माध्यम समूहाने 'महा आयकॉन २०२६' या नव्या उपक्रमाचे आयोजन केले होते.

## वसुंधरेचे रक्षण करू या

वसुंधरेचे रक्षण
आपण करू या
झाडे,पशु,पक्षी
जतन करू या
निसर्गात जे आहे
ते सारे जपू या
त्याच्या साठी सारे
रक्षक बनू या
ओढे,नदी,धरणे
पाणी आणि माती
हेच आपले खरे
सखा आणि सोबती
निसर्गाशी नाते
आपण जोडू या
निसर्गातील साधने
आपली समजू या
वसुंधरेचे रक्षण
हेच खरे आरक्षण
नाही तर करेल
कौन आमचे रक्षण

**– धोंडीरामसिंह राजपूत**

# मुंडेंच्या धडक कारवायांमुळे अन्न व औषध विभागात खळबळ; भेसळखोरांवर कारवाईचा सपाटा

राज्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग सध्या मोठ्या चर्चेचा विषय ठरत आहे. गेल्या सहा ते सात दिवसांत विभागाकडून करण्यात आलेल्या सलग कारवायांमुळे भेसळखोर, बेकायदेशीर साठेबाज आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यावसायिकांमध्ये खळबळ उडाली आहे. विविध ठिकाणी छापे टाकून संशयित अन्नपदार्थांचे साठे जप्त करण्यात आले आहेत, तर काही कंपन्यांवर सीलची कारवाईही करण्यात आली आहे.

अन्न व औषध प्रशासन आयुक्त म्हणून आयएएस अधिकारी तुकाराम मुंडे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर विभागाच्या कामकाजात वेग आणि कडकपणा आल्याची चर्चा प्रशासनिक वतुर्ळात सुरू आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या मोहिमेमुळे अनेक वर्षांपासून दुर्लक्षित राहिलेले प्रश्न ऐरणीवर आले आहेत.

विशेष म्हणजे, अवघ्या काही दिवसांत म ोठ्या प्रमाणावर संशयित किंवा निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांचे साठे समोर येत असतील, तर यापूर्वी किती काळ अशा प्रकारचा गैरव्यवहार सुरू होता, असा प्रश्न सामान्य नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. भेसळयुक्त अन्नपदार्थ आणि निकृष्ट दर्जाच्या उत्पादनांमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्याम ुळे अशा कारवायांचे स्वागत होत असले तरी या प्रकारांना इतका काळ आळा का बसला नाही, याचीही चर्चा सुरू आहे.

प्रशासनातील एका अधिकाऱ्याने इच्छाशक्ती, पारदर्शकता आणि जबाबदारीच्या भावनेने काम केल्यास मोठे बदल घडू शकतात, याचे उदाहरण म्हणून या कारवायांकडे पाहिले जात आहे. म ात्र, ही मोहीम सातत्याने सुरू राहणार का, की काही काळानंतर तिचा वेग मंदावणार, याकडेही नागरिकांचे लक्ष लागले आहे.

राज्याच्या प्रशासनात कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांच्या बदल्या आणि त्यामागील राजकीय समीकरणे हा नेहमीच चर्चेचा विषय राहिला आहे. त्यामुळे भेसळीविरोधातील ही मोहीम किती काळ प्रभावीपणे सुरू राहते आणि तिचे दीर्घकालीन परिणाम काय होतात, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होणार आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, पूकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# औद्योगिक गुंतवणुकीबरोबर पर्यावरण संवर्धनालाही प्राधान्य द्या

## प्रशासन उद्योजकांच्या पाठीशी; नियोजनबद्ध औद्योगिक विकासासाठी सहकार्याची ग्वाही सीआयआयच्या १६ व्या परिषदेत विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर दि.२२ (प्रतिनिधी)- औद्योगिक विकास हा आर्थिक प्रगतीचा आधार असला तरी त्याचबरोबर पर्यावरणाचा समतोल राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. उद्योग क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक करताना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासासाठीही उद्योगांनी योगदान द्यावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी भारतीय उद्योग महासंघाच्या (सीआयआय) पदाधिकाऱ्यांना केले. येथील हॉटेल गेटवेमध्ये आयोजित सीआयआयच्या १६ व्या परिषदेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी सीआयआयचे श्रीकांत मुंदडा, आरती कुचिभाटला, दीपक गर्ग, पराग सातपुते, नरेंद्र कुलकर्णी, पुष्कर हाते यांच्यासह विविध उद्योग समूहांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत म्हणाले की, काही दशकांपूर्वी बजाज उद्योग समूहाने छत्रपती संभाजीनगरमध्ये औद्योगिक विकासाचा पाया घातला.



त्यानंतर शहरात उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले असून देश-विदेशातील नामांकित कंपन्यांनी येथे गुंतवणूक केली आहे. परिणामी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली असून भविष्यातही रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात शाश्वत आणि संतुलित औद्योगिक विकासाला प्रोत्साहन दिले जात आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे कामगार व नागरिकांसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्याचे काम प्रशासनाकडून प्राधान्याने सुरू आहे. उद्योजकांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन सदैव तत्पर असून कोणत्याही समाजकंटकांकडून त्रास होत असल्यास उद्योजकांनी थेट व्हॉट्सॲपद्वारे तक्रार करावी. अशा प्रकरणांमध्ये संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. उद्योजक आणि प्रशासन यांच्या परस्पर सहकार्यामुळे नियोजनबद्ध व गतिमान औद्योगिक विकास साध्य होऊ शकतो, असे नमूद करत त्यांनी औद्योगिक परिसरातील विनापरवाना अथवा अनधिकृत बांधकामे असलेल्या उद्योजकांनी शासनाने दिलेल्या मुदतीत गुंठेवारी नियमितीकरणाची प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन केले. परिषदेत उपस्थित उद्योग प्रतिनिधींनी छत्रपती संभाजीनगरमध्ये उपलब्ध असलेल्या औद्योगिक वातावरणाची प्रशंसा केली. टोयोटा, जेएसडब्ल्यूसारख्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी येथे गुंतवणूक केल्याने शहराची औद्योगिक ओळख अधिक बळकट झाली आहे. भविष्यात आणखी मोठ्या गुंतवणुकीची अपेक्षा असून छत्रपती संभाजीनगर हे देशातील महत्त्वाचे औद्योगिक केंद्र म्हणून उदयास येत असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. यावेळी विभागीय आयुक्तांनी उद्योग क्षेत्रातील अनियमितता दूर करण्याबरोबरच पर्यावरणाच्या शाश्वत संवर्धनासाठी उद्योगांनी पुढाकार घ्यावा, वृक्षारोपण, जलसंधारण, ऊर्जा बचत आणि हरित तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, असे आवाहन केले. उद्योग, पर्यावरण आणि समाज यांच्यातील समतोल राखत आदर्श औद्योगिक क्षेत्र उभारण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. छत्रपती संभाजीनगरला आज 'इलेक्ट्रिक व्हेईकल कॅपिटल' म्हणून नवी ओळख मिळत असून भविष्यात हे शहर देशाच्या औद्योगिक नकाशावर अधिक ठळकपणे झळकेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## आयुक्त अमोल येडगे यांनी दिलेले आश्वासन केले पूर्ण; दिव्यांग महिलेला प्रमाणपत्र व उदरनिर्वाह भत्त्याचा धनादेश प्रदान



छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- सेवन हिल अतिक्रमण निर्मूलन कारवाईनंतर सोशल मीडियावर एका दिव्यांग महिलेबाबत दिशाभूल करणारा व्हिडिओ व्हायरल झाल्याची घटना काही दिवसांपूर्वी समोर आली होती. या प्रकरणाची दखल घेत महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांनी संबंधित महिलेची प्रत्यक्ष भेट घेऊन तिची परिस्थिती जाणून घेतली होती. तसेच तिला महानगरपालिकेच्या दिव्यांग नागरिकांसाठीच्या उदरनिर्वाह भत्ता योजनेत समाविष्ट करण्याचे आश्वासन दिले होते.

त्या अनुषंगाने आज आयुक्त अमोल येडगे यांच्या हस्ते संबंधित दिव्यांग महिलेला दिव्यांग प्रमाणपत्र तसेच दिव्यांग व्यक्तींना देण्यात येणाऱ्या मासिक उदरनिर्वाह भत्त्याचा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील, मुख्य लेखा अधिकारी तथा अतिक्रमण नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे, उप आयुक्त लाखिचंद चव्हाण, महिला व बाल कल्याण अधिकारी विनोद परदेसी, प्रशासनातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिकेने दिलेले आश्वासन प्रत्यक्षात पूर्ण केल्याने संबंधित महिलेला आर्थिक आधार मिळणार असून तिच्या जीवनमानात सकारात्मक बदल होण्यास मदत होणार आहे. समाजातील गरजू व वंचित घटकांपर्यंत शासकीय योजनांचा लाभ पोहोचविण्यासाठी महानगरपालिका कटिबद्ध असल्याचे यावेळी आयुक्तांनी सांगितले.

## मोबाईल ॲपवरुन खत खरेदी; फुलंब्रीत जिल्हाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत जनजागृती



छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- राष्ट्रीय खत विक्री आराखड्यानुसार मोबाईल ॲपद्वारे खत नोंदणी व वितरण करण्यासाठी 'फ्रेमवर्क फॉर फर्टीला यझर सेल', चा पथदर्शी प्रकल्प छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राबविला जात आहे. आजपासून हा प्रकल्प कार्यान्वित झाला. फुलंब्री येथे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांच्या उपस्थितीत शेतकऱ्यांना या ॲप बद्दल माहिती देण्यात आली. जिल्हा परिषदेचे अति.मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे,उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी, तहसीलदार योगिता खटावकर, कृषी अधिकारी पंकज वाकळे, कृषी अधिकारी गुणनियंत्रण शांतीलाल हिवराळे, राम बेंबरे आदी अधिकारी व कर्मचारी तसेच खत विक्रेते,शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी जनजागृतीपर पोस्टरचे विमोचनही जिल्हाधिकारी गौडा यांच्या हस्ते करण्यात आले.

## विभागीय आयुक्त कार्यालयात पहिले कर्मचारी समाधान शिबिर संपन्न

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित सेवाविषयक अडचणींचे तातडीने निराकरण करण्यासाठी संबंधित विभागांनी पूर्ण क्षमतेने कार्य करावे, असे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी दिले. त्यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेले पहिले विभागीय कर्मचारी समाधान शिबिर आज विभागीय आयुक्त कार्यालयात संपन्न झाले. या शिबिरात पाच सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचा निपटारा करण्यात आला.



विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांच्या पुढाकारातून संपूर्ण विभागात प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी 'कर्मचारी समाधान शिबिर' आयोजित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुसार जून महिन्यातील पहिले विभागस्तरीय शिबिर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात पार पडले. यावेळी सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. महसूल, महानगरपालिका आणि नगररचना विभागातील सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यावेळी आपल्या तक्रारी सादर केल्या.

यावेळी बोलताना विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी सांगितले की, सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना रजा नोंदी, पेन्शन, ग्रॅच्युइटी, वेतनवाढीची थकबाकी तसेच इतर देय रक्कम वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क आहे. कार्यालयीन प्रक्रियेत होणाऱ्या विलंबामुळे या रकमा वेळेवर न मिळणे ही गंभीर बाब आहे. काही प्रकरणांमध्ये विभागीय चौकशी प्रलंबित असल्याने संबंधितांना त्यांचे आर्थिक हक्क वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे विभागीय चौकशीची प्रकरणे तातडीने निकाली काढून कर्मचाऱ्यांना न्याय द्यावा, असे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

सहआयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार यांनी शिबिरात प्राप्त झालेल्या तक्रारींची माहिती दिली. तसेच प्रत्येक महिन्याच्या पहिल्या शुक्रवारी आयोजित करण्यात येणाऱ्या 'कर्मचारी समाधान शिबिरा'च्या माध्यमातून जिल्हास्तरीय तक्रारी जिल्हा पातळीवर आणि तालुकास्तरीय तक्रारी तालुका पातळीवर सोडविण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

या उपक्रमामुळे शासन सेवेत कार्यरत तसेच सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्यांचे जलद आणि प्रभावी निराकरण होण्यास मदत होणार आहे.

## झाडे लावा आणि जगवा; प्रत्येक नागरिकाने एका झाडाची वर्षभर जबाबदारी घ्यावी-महापौर समीर राजूरकर

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सुखना नदीच्या काठावर आज मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी भारतीय वंशाच्या सुमारे अडीच हजार झाडांचे रोपण करण्यात आले.



कार्यक्रमात बोलताना महापौर समीर राजूरकर म्हणाले की, केवळ झाडे लावून पर्यावरण संवर्धनाचा उद्देश साध्य होणार नाही. प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याची वर्षभर काळजी घेत ती जगविण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. झाडांचे संगोपन आणि संवर्धन झाले तरच वृक्षारोपण मोहिमेला खऱ्या अर्थाने यश मिळेल. प्रत्येक नागरिकाने एक झाड लावून ते वाढविण्याचा संकल्प करावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या वृक्षारोपण कार्यक्रमास आमदार अनुराधा चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच महापौर समीर राजूरकर, स्थायी समिती सभापती अनिल मकरिये, नगरसेवक शिवाजी दांडगे, त्र्यंबक तुपे, काकासाहेब काकडे, मनोज गांगवे, गणेश नावंदर, रवी कावडे, गोकुळ मलके, नगरसेविका कीर्ती शिंदे, अनिता मानकापे, अर्चना नीलकंठ, माधुरी अदवंत, सुरेखा सानप, अर्चना चौधरी,

विभागीय आयुक्त जी श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गवडा, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे, अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उपआयुक्त नंदकिशोर भोंबे, विकास नवाळे, शहर अभियंता संजय कोंबडे, अपर्णा थेटे, उद्यान अधीक्षक विजय पाटील, मुख्य लेखा अधिकारी संतोष वाहुळे आदी उपस्थित होते.

पर्यावरण संवर्धन आणि हरित शहर निर्मितीच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

## घाटी रुग्णालयात टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनची आगळीवेगळी आरोग्यसेवा; स्ट्रेचर, व्हिलचेयर, टेबल, बाकडे आदीची केली मोफत दुरुस्ती

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- डॉक्टर, नर्स आणि स्टाफ हे रुग्णांच्या उपचारासाठी परिश्रम घेत असतात. मात्र पडद्यामागे प्रशासन, चतुर्थश्रेणी कामगार आणि परिसरात काम करणारे अनेक हात राबतात. अशीच काही आगळीवेगळी आरोग्यसेवा करण्याचा प्रयत्न औरंगाबाद टुव्हिलर मेकॅनिक असोसिएशन छत्रपती संभाजीनगरच्या वतीने करण्यात आली.



सेवेची संधी दिल्याबद्दल अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे यांचा संघटनेच्या वतीने स्वागत करण्यात आले. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय (घाटी) येथे संघटनेच्या स्ट्रेचर, व्हिलचेयर, टेबल, बाकडे आदीची मोफत दुरुस्ती केली.

दररोज हजारो रुग्ण आणि नातेवाईक येथे येतात. त्यामुळे साहजिकच अनेकदा यावस्तू खराब होतात. स्ट्रेचरची चाके, पेशंटला बसण्याची खुर्ची आणि बाकडे, टेबल आदीची मोफत दुरुस्तीची सुरवात ओपीडीमधुन करण्यात आली. याठिकाणी तीस खुर्च्यांची, सहा स्ट्रेचरची आणि इतर वस्तूची दुरुस्ती करण्यात आली. यानंतर यापुढे वर्षभर क्रमाक्रमाने पुर्ण घाटी रुग्णालयातील स्टेचर तसेच खुर्च्यांची दुरुस्ती करण्यात येणार आहे. या निष्काम कर्मयोग कार्यासाठी संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद, जिल्हा समन्वय समितीचे अध्यक्ष राम पारखे, जिल्हा उपाध्यक्ष मुन्ना शेख, जिल्हा उपाध्यक्ष शेख नुर,विभागप्रमुख बाळासाहेब पवार, विभागप्रमुख सरवर खान, विभागप्रमुख शेख जमीर, विभागप्रमुख शेख सलीम, विभागप्रमुख अजय राजपूत योगदान देत आहेत. पुढील काळात कर्करोग रुग्णालय व घाटी परिसरात कामासाठी तालुकास्तरावरील पदाधिकारी या कार्यात सहभागी होणार आहेत.

## माझं गाव आरोग्य संपन्न गाव अंतर्गत जिल्हाधिकाऱ्यांची मुर्शीदाबाद वाडी येथे भेट



छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- मौजे मुर्शीदाबाद वाडी ता. फुलंब्री येथे आज जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी भेट देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. 'माझं गाव – आरोग्य संपन्न गाव' या अभियानाचा आढावा घेण्यात आला. तसेच जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

याप्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे, उपविभागीय अधिकारी नीलम बाफना, तहसीलदार योगिता खटावकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

निरोगी पर्यावरणासाठी वृक्षारोपण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. चला, हरित व आरोग्यसंपन्न गाव घडविण्यासाठी एकत्र येऊया, असा संदेश जिल्हाधिकारी गौडा यांनी ग्रामस्थांशी बोलतांना दिला.

(पान १ वरुन)

### मला मोदी खूप आवडतात. ते माझे खूप चांगले...

लागू होऊ शकते. यामुळे अमेरिकेच्या बाजारपेठेत भारतीय उत्पादने अधिक महाग होऊ शकतात आणि त्याचा निर्यातदारांवर परिणाम होऊ शकतो. भारत सरकारचे म्हणणे आहे की, या अतिरिक्त शुल्काबाबत कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. अंतिम निर्णय घेण्यापूर्वी अमेरिका या प्रस्तावावर प्रथम जनतेचा आणि हितधारकांचा अभिप्राय घेईल.

भारत आणि अमेरिका फेब्रुवारी २०२६ मध्ये एका अंतरिम व्यापार करारावर सहमत झाले होते. त्याचा उद्देश दीर्घकाळ प्रलंबित असलेले व्यापारविषयक प्रश्न सोडवणे हा होता. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने ट्रम्प यांचे काही टॅरिफ बेकायदेशीर घोषित केले. यानंतर, कोणते टॅरिफ कायम राहतील आणि कोणते नाही, हे अस्पष्ट झाले होते. याचा परिणाम अमेरिका-भारत व्यापार करारावर झाला. अंतरिम व्यापार करार अद्याप अंतिम झालेला नाही.

### काँग्रेसचे किनवट उपविभागीय कार्यालयात पेरणी...

तातडीने प्रभावी उपाययोजना कराव्यात, असे आंदोलनकर्त्यांनी नमूद केले.

आदिवासी, महिला आणि वंचित घटकांच्या विकासासाठी विशेष धोरण आखावे, तसेच शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पारदर्शकपणे पोहोचविण्यासाठी प्रशासनाने अधिक उत्तरदायी भूमिका घ्यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली.मोर्चानंतर काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शासनाने जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावेत, अशी मागणी केली. बेरोजगारी, महागाई, शेतकरी व आदिवासी समाजाच्या प्रश्नांवर ठोस उपाययोजना न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

### पक्षादेश नसताना परस्पर उमेदवारी अर्ज...

दुष्यंत चतुर्वेदी बिनविरोध झाले. या सर्व राजकीय घडामोडी जुळून आणण्यासाठी धुरंदर म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्याकडे पाहिले जाते.

महाविकास आघाडीचे उमेदवार साहेबराव कांबळे यांनी ३ जूनला आपला अर्ज मागे घेतला. यामागे ठाण्यातील नंदनवन कारणीभूत ठरल्याची चर्चा आहे. मात्र पुरेसे मतदार नसल्याचे कारण सोमर दाखवीत आपला उमेदवारी अर्ज मागे घेतला. तर महाविकास आघाडीचा पुरस्कृत उमेदवार म्हणून सय्यद फारूक यांनी सुद्धा अर्ज मागे घेतला. तर भाजपचे बंडखोर नितीन पुतळा यांनी मुंबई येथे जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि चंद्रशेखर बावनकुळे यांची धावती भेट घेतली आणि वेट आणि वॉच भूमिका घेण्यास सांगितले. शेवटी अर्ज मागे घेण्याच्या काही क्षणाआधी माजीमंत्री मदन येरावार यांच्या सोबत येत युती धर्माची आठवण येत उमेदवारी मागे घेतली.

## महावितरणच्या ५२ कर्मचाऱ्यांचे रक्तदान; वर्धापन दिनाच्या पूवसंध्येला सामाजिक बांधिलकीची जोपासना

छत्रपती संभाजीनगर दि.५ (प्रतिनिधी)- महावितरणचा २१ वा वर्धापन दिन शनिवारी (०६ जून) मोठ्या उत्साहात मात्र साधेपणाने साजरा होत आहे. वर्धापन दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यालय 'प्रकाशगड' येथे शुक्रवारी आयोजित रक्तदान शिबिराला सामाजिक बांधिलकी जोपासत कर्मचारी व अधिकाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला. सर जे. जे. महानगर रक्तपेढीच्या सहकार्याने आयोजित रक्तदान शिबिरात ५२ रक्त बाटल्यांचे संकलन झाले.




प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार महावितरणचा २१ वा वर्धापन साधेपणाने साजरा करण्यात येत आहे. शनिवारी सकाळी दहा वाजता 'प्रकाशगड' येथील प्रेक्षागृहात आयोजित वर्धापन दिनाच्या मुख्य कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला उपस्थित राहणार आहेत. तर मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव तसेच महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असतील. स्वतंत्र संचालक श्री. विश्वास पाठक यांची विशेष उपस्थिती राहणार आहे. संचालक श्री. सचिन तालेवार (संचालन/प्रकल्प), श्री. योगेश गडकरी (वाणिज्य), श्री. अनुदीप दिघे (वित्त), श्री. राजेंद्र पवार (मानव संसाधन) कार्यक्रमाला उपस्थित राहणार आहेत.

वर्धापन दिनाच्या कार्यक्रमाला विधायक व सामाजिक उपक्रमाची जोड देताना पूर्वसंध्येला मुख्य कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला उत्स्फुर्त प्रतिसाद देत कर्मचारी व अधिकाऱ्यांनी शिबिरात सहभाग नोंदवला. संचालक श्री. राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री. परेश भागवत यांनी शिबिरात सहभागी होत रक्तदानासाठी कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले.

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME -** 1) SHAIKH IFRA
2) IFRA PARVEEN SHAIKH VIQUAR
3) IFRA PARVEEN WAHEED KHAN
**NEW NAME -** IFRA PARVEEN KHAN WAHEED KHAN
**Address -** PLOT NO C-47 NEAR CHANDMARI MASJID NEW NANDANVAN COLONY AURANGABAD MAHARASHTRA-431001

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
I HAVE CHANGING MY NAME FROM
OLD NAME - NILOFER BEGUM NAYEEM KHAN
TO
NEW NAME - KHAN NEELOFAR NAYEEM KHAN
AS PER DOCUMENT
ADDRESS -H.NO.99, CHAMPA MASJID, CHAMPA CHOWK, MHB COLONY, AURANGABAD, 431001 MAHARASHTRA

दैनिक लोकविजय CHANGE OF NAME
I HAVE CHANGE MY NAME FROM
**OLD NAME -** 1) SHAIKH VIQUAR SHAIKH AHMAD
2) SHAIKH VIQUAR
**NEW NAME -** SHAIKH VIQUAR SHAIKH AHMED
**Address-** PLOT NO C-47 NEAR CHANDMARI MASJID NEW NANDANVAN COLONY AURANGABAD MAHARASHTRA-431001